# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १३८-२२ दिनांक :- १३/०५/२०२२

## बतावणी करुन सोन्याचे दागिने लंपास करणा-या टोळीला पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष-२ वसई पथकास यश

तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं. २२२/२०२२ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे या गुन्ह्यातील फिर्यादी सौ. मिरा अनुष्ठाण, वय ५० वर्षे, व्यवसाय-चप्पल विक्री, रा.दुर्गा माता मंदिरजवळ, लक्ष्मीनगर, प्रिंस पार्क, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर या दिनांक ०२/०४/२०२२ रोजी ११.०० वा. सुमारास बाजारात भाजी आणण्यासाठी रहमत नगर, नालासोपारा पुर्व येथे गेल्या असता तेथे गुन्हयातील आरोपीतांनी त्यांना बोलण्यात गुंतवुन आरोपीतांनी त्यांचे गळयातील मंगळसुत्र व कर्णफुले काढण्यास सांगुन ते रुमालात गुंडाळत असल्याचे भासवुन हातचलाखीने त्यांचे सोन्याचे दागिने फसवणुक करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०२/०४/२०२२ रोजी १६.०८ वा. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपास करुन गुप्त बातमीदाराकरवी माहीती प्राप्त करुन नमुद गुन्हयातील आरोपीत यांची नावे निष्पन्न करुन आरोपीत १) संजय राजु सलाट, वय-२० वर्ष २) भिमाभाई शांतीलाल राठोड वय ४० वर्ष ३) अर्जुन शांतीलाल राठोड, वय-१८ वर्ष वरील सर्व सध्या रा. ओम साई चाळ, कन्हेर, खैरपाडा, ईश्वरनगर, विरार फाटा, विरार पुर्व मुळ रा. नेहरुनगर झोपडपट्टी, केवल कचोरी दुकानाचे समोरची गल्ली, कुबेर नगर, अहमदाबाद, जि. अहमदाबाद यांना ताब्यात घेवून नमुद आरोपीत याचेकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं |
|---|---|---|
| १) | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २२२/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| २) | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २०७/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ३) | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २१७/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ४) | विरार पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २१४/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ५) | विरार पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ३५३/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ६) | विरार पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ३७६/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ७) | विरार पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ४२७/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| ८) | घाटकोपर पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं २८१/२०२२ भादविस कलम ४२०, ३४ प्रमाणे |

वरील आरोपीत यांना प्रथम तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २२२/२०२२ या गुन्हयात अटक करुन गुन्हयाचे तपासात आरोपीत यांचेकडुन मेमोरंडम पंचनाम्याद्वारे नमुद गुन्हयातील सोने हस्तगत करण्यात आले असून सदर गुन्हयाचा तपास सपोनिरी/सागर शिंदे नेम- गुन्हे शाखा कक्ष -२ वसई हे करीत आहेत.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सागर शिंदे, सहाफौज/रमेश भोसले, पोहवा/ संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, जगदीश गोवारी, पोना/प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम/ अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी केली आहे.

-------ooo------